# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०७/१०/२०२२ (शुक्रवार)**

**(सकाळ)**

---

### खून

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत १२ कि. मी अंतरावरील यश सावजी हॉटेल व हिंदुस्थान पेट्रोलीयम पंपजवळ डुमरी खुर्द शिवार कन्हान येथे दिनांक ०६/१०/२०२२ चे ०३.३० वा. ते ०४.०० वा. दरम्यान आरोपी नामे– अमन अशोक श्रीवास्तव, वय २२ वर्ष, रा. बहतराई स्टेडीयमच्या समोर निखील आश्रम, अटल आवास पोस्टे सरकंडा छत्तीगड जि. बिलासपुर व मृतक नामे– राजु दुबे, वय अंदाजे ५० वर्ष, रा. यश सावजी हॉटेल, कन्हान हे एकाच ठिकाणी यश सावजी हॉटेल येथे काम करीत असुन यातील आरोपी व मृतक यांचे दारूचे नशेत जेवणाचे कारणावरून भांडण झाले असुन आरोपीने मृतकाच्या डोक्यावर व शरीरावर धारधार हत्याराने वार करून जिवानिशी ठार मारले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आकाश तिलकचंद टिकम, वय २६ वर्ष, रा. डुमरी खुर्द यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३०२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री फुलझेले मो.क्र. ९४०४१२३९५० हे करीत आहे.

### घरफोडी

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ३० कि. मी. अंतरावरील मौजा नागलवाडी येथे दिनांक ०५/१०/२२ चे ०५.०० वा. ते ०८.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– सौ. मंगला सुनीलजी दहीकर, वय ४२ वर्ष, रा. नागलवाडी यांचे घराचे दाराचे कडी कोंडा अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने घराचे आत मध्ये ठेवलेले लोखंडी कपाटातुन १२,०००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार प्रमोद बन्सोड मो.नं ९९२३४१०२२३ हे करीत आहे.

### चोरी

**पो.स्टे. बेला**:– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील बाजार चौक बेला येथे दिनांक ०५/१०/२२ चे १९.०० वा. ते ०६/१०/२२ चे ०८.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर कृष्णराव भोयर, वय ६६ वर्षे, रा. वार्ड क्र ०४ गुजरी चौक बेला तह उमरेड जि. नागपुर यांचे दुकानातील अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन गल्ल्यातील ३,३०५/–रू. व त्यांचे दुकाना समोरील श्री गणेश मेडीकल येथील त्यांचे काउंटर मधुन सुध्दा अंदाजे ३,०००/–रू. रोख असा एकुण कि. ६,३०५/–रू. चा मुद्देमाल नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५४, ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार अजय चौधरी मो क्र ९८२३१८६६८६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**